पशुसंवर्धन माहिती पुस्तिका

# ११. राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, पुणे - १६

# ११. राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे - १६.

**प्रस्तावना :-**

राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे-१६ ही संस्था दिनांक १७ मार्च १९८२ रोजी सुरू झाली असून पशुसंवर्धन खात्यातील पशुधन पर्यवेक्षक व सहायक पशुधन विकास अधिकारी या तांत्रिक कर्मचाऱ्यांचा दोन वर्ष मुदतीचा पदविका अभ्यासक्रम सदर संस्थेकडून आयोजित करण्यात येत होता. तद्नंतर सन २००१ मध्ये शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०२००१/२४२/०२/(२८४)/पदुम-४, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १० ऑक्टोबर २००१ अन्वये दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम बंद करून त्याऐवजी सेवांतर्गत ओरिऐंटेशन अभ्यासक्रम या संस्थेमध्ये दिनांक ०३ डिसेंबर २००१ पासून सुरू करण्यात आला. सदरचा अभ्यासक्रम १५ दिवस मुदतीचा होता व त्यामध्ये खात्यातील पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व सहायक पशुधन विकास अधिकारी यांच्या प्रत्येकी १० तुकड्यांना (एकूण २० तुकड्या) प्रशिक्षण देण्यात येत होते.

सन २००७-०८ पासून सदरचा १५ दिवस मुदतीचा अभ्यासक्रम बंद करून महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक संकीर्ण - १००७/प्रक्र-१९६/पदुम-४/कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग मंत्रालय विस्तार, मुंबई-३२, दिनांक ५ एप्रिल २००७ अन्वये व खात्याचे पत्र क्रमांक/प्र.-२/१७/५४८/८९९/२००७, पसं - १३, पुणे-१, दिनांक १० मार्च २००७ अन्वये सेवांतर्गत ओरिऐंटेशन अभ्यासक्रमाचा कालावधी हा पाच दिवसांचा करण्यात आलेला असून एका वर्षात खात्यातील जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी/सहायक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक/सहायक पशुधन विकास अधिकारी, प्रशासन अधिकारी/अधीक्षक यांच्या एकूण ४० तुकड्यांना आर्थिक वर्षात प्रशिक्षण देण्यात येते.

सन २०११-१२ पासून या संस्थेने क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या गरजेनुसार **रिप्रॉडक्टीव्ह हेल्थ मॅनेजमेंट इन बोव्हाइन्स** हे ट्रेनिंग मोड्युल प्रायोगिक तत्त्वावर प्रस्तावित केलेले आहे.

राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे-१६ हे कार्यालय मेंढी फार्म आवार गोखलेनगर, पुणे-१६ या परिसरात शासकीय इमारतीमध्ये कार्यरत असून प्रशिक्षणार्थींच्या निवासासाठी वसतिगृह सुविधा उपलब्ध आहे. तसेच खात्यांतर्गत अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी अतिथीगृह सुविधा उपलब्ध आहे. सद्यस्थितीत दोन प्रशिक्षण दालने असून त्यापैकी एक प्रशिक्षण दालन प्रशिक्षणासाठी उपयोगात आणले जाते.

वसतिगृह, अतिथीगृह व प्रशिक्षण वर्ग यांचा पूर्ण क्षमतेने वापर करणेसाठी सन २०११-१२ मध्ये पशुसंवर्धन विभागांच्या विविध योजनामधुन निधी उपलब्धतेनुसार त्यांचे आधुनिकीकरण/नुतनीकरण करण्याचे प्रस्तावित आहे.

**प्रशिक्षणार्थीची निवड :-**

प्रशिक्षणार्थींची निवड ही प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे स्तरावरुन करण्यात येते. खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांना दर तीन वर्षांनी प्रशिक्षण दिले जाते.

**प्रशिक्षण :-**

उजळणी प्रशिक्षणामध्ये तांत्रिक व अतांत्रिक विषयावर उपयुक्त अशी माहिती संस्थेतील तसेच खात्यातील व खात्याबाहेरील तज्ज्ञामार्फत प्रशिक्षणार्थीना देण्यात येते.

क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या गरजेनुसार **रिप्रॉडक्टीव्ह हेल्थ मॅनेजमेंट इन बोव्हाइन्स** व **एक्सटेंशन ट्रेनिंग मोड्युल** हे ट्रेनिंग मोड्युल प्रायोगिक तत्त्वावर प्रस्तावित करणेत आलेले आहेत.

**प्रात्यक्षिक माहिती :-**

प्रशिक्षणार्थीना खात्यातील स्थानिक संस्था रोग अन्वेषण विभाग, पशुजैवपदार्थ निर्मिती केंद्र, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, अतिशीत रेत प्रयोगशाळा, पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, माहिती तंत्रज्ञान कक्ष येथे प्रात्यक्षिकासाठी नेऊन तांत्रिक बाबीतील प्रात्यक्षिक कामांबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

**चर्चासत्र :-**

उजळणी प्रशिक्षणामध्ये तांत्रिक व अतांत्रिक विषयावरील चर्चासत्र प्रशिक्षण कालावधीमध्ये पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक/सहायक पशुधन विकास अधिकारी व संस्थेतील अध्यापक वर्ग यांचे सहभागाने ठेवण्यात येते, त्यासाठी वाचनालयातील पुस्तिकांचा उपयोग करण्यात येतो.

**ग्रंथालय सुविधा :-**

या संस्थेअंतर्गत ग्रंथालय सुविधा उपलब्ध असून विविध तांत्रिक व अतांत्रिक विषयांची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध आहेत. या ग्रंथालयात तांत्रिक विषयांचे जर्नल्स घेता आल्यास पाच दिवसांच्या प्रशिक्षण कालावधीत तांत्रिक ज्ञान अद्यावत करण्याच्या दृष्टीने निश्चितच फायद्याचे ठरणार आहे. त्यामुळे मराठी तसेच इंग्रजी तांत्रिक विषयांचे जर्नल्स, इ-जर्नल्स, इ-लायब्ररी सभासदत्व तसेच नवीन तांत्रिक पुस्तके (न्यु एडिशन्स) उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे.

**संगणक कक्ष सुविधा :-**

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्रास १५ संगणक उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

**सन २०११-१२ या वर्षात संस्थेमार्फत प्रस्तावित बाबी :-**

सन २०११-१२ या वर्षात संस्थेमार्फत खालील विविध बाबी बांधकाम विभाग व विद्युत विभागाकडे राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे - १६ या संस्थेच्या बळकटीकरण व स्वेच्छानिधी अंर्तगत प्रस्तावित आहेत.

१. प्रशिक्षण दालन क्रमांक ०१ व ०२ चे आधुनिकीकरण करणे.

२. त्रिकोणी अतिथीगृहाचे आधुनिकीकरण करणे.

३. दगडी वसतीगृहाचे आधुनिकीकरण करणे.

४. नवीन निवासस्थाने बांधणे.

५. भोजनगृह व्यवस्था उपलब्ध करणे.

६. रिक्रीएशन केंद्र बांधणे.

७. उद्यान व लँडस्केपिंग करणे.

८. अद्यावत ग्रंथालय सुविधा व संगणक कक्षाचे नुतनीकरण करणे.

♦♦♦